# मराठी विभाग : उद्बोधन व्याख्यान-२०२४-२०२५ : अहवाल

प्रतिवर्षी महाविद्यालयात नव्याने दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांना महाविद्यालय, विविध विभाग आणि त्या विभागामार्फत चालणारे विविध उपक्रम यांचा परिचय व्हावा, या हेतूने प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या सत्राच्या आरंभी उद्बोधन व्याख्यानाचे आयोजन केले जाते.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून पदवी स्तरावर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० (NEP-2020) लागू झालेले असल्याने या धोरणाचा, अभ्यासक्रमाचा तसेच मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीचा विद्यार्थ्यांना परिचय व्हावा या उद्देशाने ‘उद्बोधन व्याख्यान’ घेण्याचे नियोजन करण्यात आले.

शहिद भगतसिंग महाविद्यालय, किल्लारी, जिल्हा लातूर येथील प्राध्यापक तथा भाषा, साहित्य, संस्कृती तसेच शेती प्रश्नाचे अभ्यासक डॉ. ज्ञानदेव राऊत यांचे व्याख्यान तसेच काही निवडक विद्यार्थ्यांचे कवितावाचनही या निमित्ताने आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेशचंद्र शिंदे हे होते. यावेळी मंचावर विभागप्रमुख डॉ.संजय जगताप आणि डॉ.शिवाजी सूर्यवंशी यांची उपस्थिती होती.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेशचंद्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उद्बोधन व्याख्यानात बोलताना डॉ. ज्ञानदेव राऊत म्हणाले : ‘मराठी भाषा आणि साहित्याचे विद्यार्थी असणे ही वरवर पाहता साधी आणि सोपी गोष्ट वाटत असली तरी आपल्या ग्राम संस्कृतीचे सजग भान बाळगून बदलत्या भवतालाकडे संवेदनशीलतेने पाहून शेती-मातीचे प्रश्न समजून घेणे ही विद्यार्थ्यांची नैतिक जबाबदारी असल्याचे’ असे प्रतिपादन त्यांनी केले.

'शेतीप्रश्न आणि मराठी साहित्य' यांचे अभ्यासक असलेल्या डॉ.ज्ञानदेव राऊत यांनी आपल्या व्याख्यानात मराठी साहित्यात आजपर्यंत चित्रित झालेल्या शेतकरी,शेतीप्रश्न तसेच गावगाडा यांचा आढावा घेत कृषी जनसंस्कृतीच्या वास्तव चित्रणाबाबत मराठी साहित्याने दुजाभाव केल्याचे परखड मत व्यक्त केले. आपल्या भवतालातील आरक्षणाचे प्रश्न हे मूलतः शेती-मातीचे प्रश्न असून त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्यापेक्षा आपण ते संवेदनशीलतेने समजून घ्यायला हवेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

'मराठी भाषा ही रोजगाराच्या संधी मिळवून देणारी आहे, हे खरे आहेच; प्रशासकीय सेवेमध्ये जाण्यासाठी तसेच मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक या दोन्ही माध्यमांमध्ये नोकरीच्या संधींसाठी मराठी पूरक ठरणारी आहे. परंतु आपल्या भाषेचा केवळ नोकरी आणि व्यवसायापुरता सीमित विचार न करता, संवेदनशील होऊन समाजाच्या प्रश्नांकडे पाहणे आणि सर्जनशील होऊन साहित्यातून या प्रश्नांची उकल शोधणे यासाठीही मराठी भाषेच्या विद्यार्थ्यांनी पुढे यायला हवे,' असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.

प्राचार्य डॉ.गणेशचंद्र शिंदे यांनी अध्यक्षीय भाषणात 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील भाषा शिक्षणाच्या बदललत्या स्वरूपाचा वेध घेऊन विद्यार्थ्यांनी भाषेतील मूलभूत कौशल्ये आत्मसात करण्यासाठी सतत प्रयत्नशील राहण्याची गरज' व्यक्त केली.

'वाचन कट्ट्या'च्या पुढाकारातून नियोजित 'माय मराठी' महोत्सवात विद्यार्थ्यांसाठी काव्यवाचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. यामध्ये गणेश शिंदे,सिंधू कांबळे, गणेश विणकरे,गोदावरी कानशुक्ले,कृष्णा वाघमारे, आश्विनी हातागळे आणि आयुष सोनकांबळे या विद्यार्थ्यांनी आपल्या कवितांचे उत्तम सादरीकरण केले.

प्रस्तुत कार्यक्रमात पूजा तोटेवाड, शिवानी क्षीरसागर, शेख फातिमा, साक्षी देशमुख तसेच कृष्णा वाघमारे या विद्यार्थ्यांच्या पुढाकारातून बनवलेल्या भित्तिपत्रकांचे अनावरण करण्यात आले. वाचन आणि रसास्वाद याच्याशी निगडित कार्यक्रमांच्या आयोजनासाठी 'वाचन कट्टा' माय मराठी मंडळाची कार्यकारिणी देखील याप्रसंगी घोषित करण्यात आली.


प्रस्तुत 'माय मराठी' महोत्सवाचे प्रास्ताविक समन्वयक डॉ. विश्वाधार देशमुख यांनी केले.शुभेच्छापर मनोगतातून विभागप्रमुख डॉ.संजय जगताप यांनी कल्पक विद्यार्थ्यांचे कौतुक केले. पाहुण्यांचा परिचय पूजा तोटावाड या विद्यार्थिनीने तर सूत्रसंचालन शेख तबस्सुम आणि आभार प्रदर्शन आशिष चव्हाण यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शुभम राठोड, सुमित ठाकरे, रोहित जैरमोड,सत्यजित जाधव, विनायक शिंदे,प्रणिता तेलंग या विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. प्रस्तुत कार्यक्रमासाठी डॉ.मदन अंभोरे, डॉ. संतोष राऊत,डॉ. बालाजी जाधव या प्राध्यापकांसह महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.











पुरोगामी विचाराचे
**एकमत**

page- 3
01 Aug 2024


# संवेदनशील होऊन शेती-मातीचे प्रश्न विद्यार्थ्यांची समजून घ्यावेत : डॉ. राऊत

**नांदेड : मराठी भाषा आणि साहित्याचे विद्यार्थी असणे; ही वरवर पाहता साधी आणि सोपी गोष्ट वाटत असली तरी आपल्या ग्रामसंस्कृतीचे सजग भान बाळगून बदलत्या भवतालाकडे संवेदनशीलतेने पाहून शेती-मातीचे प्रश्न समजून घेणे; ही विद्यार्थ्यांची**

अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

मराठी भाषा ही रोजगाराच्या संधी मिळवून देणारी आहे, हे खरे आहेच; प्रशासकीय सेवेमध्ये जाण्यासाठी तसेच मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक या दोन्ही माध्यमांमध्ये नोकरीच्या संधींसाठी मराठी पूरक ठरणारी आहे. परंतु आपल्या

# शेतीमातीचे प्रश्न समजून घ्या

## डॉ. ज्ञानदेव राऊत यांचे विद्यार्थ्यांना आवाहन

[illegible]





[illegible]